# दीनबंधू

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**दीनबंधू : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये ८०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# अनुक्रमणिका

प्रकरण १. ------------------------------ ५
प्रकरण २. ------------------------------ ६
प्रकरण ३. ------------------------------ ८
प्रकरण ४. ------------------------------ १२
प्रकरण ५. ------------------------------ १७
प्रकरण ६. ------------------------------ १९
प्रकरण ७. ------------------------------ २९

✦✦

# दीनबंधू

## १

विलासपूर शहरात रतनशेट म्हणून एक धनाढ्य व्यापारी होते. ते कपाशीचा व्यापार करीत. त्यांचे कापडाच्या मिलमध्ये अनेक भाग होते. हजारो रुपयांची उलाढाल रोज त्यांच्याकडे चालावयाची.

रतनशेटना मूलबाळ नव्हते. त्यांनी एक दत्तक मुलगा घेतला होता. त्याचे नाव होते दीपचंद – परंतु त्याला प्रेमाने सारे बाबू अशीच हाक मारीत.

बाबू ज्या वेळेस दत्तक घेतला गेला, त्या वेळेस रतनशेटनी हजारो रुपये खर्च केले. मुंबईहून नाचणाऱ्या व गाणाऱ्या नृत्यांगना बोलावण्यात आल्या होत्या. संगीताच्या जलशात व मेजवान्यात वाटेल तसा पैसा खर्च केला गेला. खेड्यापाड्यांतून लोक भुकेने मरत होते. त्यांच्या किंकाळ्या या संगीतबहाद्दरांना, बासुंदीबहाद्दरांना, विलासलोलुपांना कोठून ऐकू येणार ? सारे नाचतमाशात दंग होते.

तो पाहा एक स्वयंसेवक खाली रस्त्यात गाणे म्हणत आहे. किती करुणरसपूर्ण तो गाणे म्हणत आहे. त्याचा आवाज मोठा परंतु गोडही आहे. त्याचा खादीचा पोषाख आहे. खांद्यावर काही खादी का आहे – विकायसाठी ? त्याचे गीत आपण ऐकू या.

**हृदय जणू तुम्हा ते नसे ।। हृदय ।।**
**बंधु उपाशी लाखो मरती ।। विलास सुचती कसे ।।हृ.।।**
**निज भगिनीच्या अंगावरती । चिंधीही ती ना दिसे ।। हृ.।।**
**गरिबांच्या मरणाने सतत । तुमचे भरति खिसे ।। हृ.।।**
**खादि वापरा, खादी घाला । इतुके मागीतसे ।। हृ.।।**
**नाचतमाशे करण्याचा हा । अवसर का हो असे ।। हृ.।।**
**देव ओळखा धर्म ओळखा । चरणा मी नमितसे ।। हृ.।।**

बाबू सोन्यामोत्याच्या दगिन्यांनी नटलेला होता. त्याच्या अंगावर भरजरी पोषाख होता. बाबू ते गाणे वरून ऐकत होता. बाबूच्या भोवती श्रीमंतापुढे गोंडे घोळणारे अनेक लाळघोटे होते. 'काय ऐकता भिकारड्याचे, चलो दिवाणखान्यात, ती दुसरी प्लेट लावू' – एकजण श्रीमंत बाबूस म्हणाला.

'कोको केला आहे – तो घ्यायला येता ना – आधी शिरा खा – पण मग वर कोको गोड लागेल का ? मध्ये थोडी शेव खावी' – दुसऱ्याने सुचविले.

बाबू खालचे गाणे ऐकत होता.

**'गरिबा नाही घास परि । खाऊनि हा मरतसे ।।हृ.।।**

'चला बाबूशेट – शिरा निवत आहे' – एकजण म्हणाला.

'हाकला रे त्या भिकाऱ्याला, येथे आला रडगाणे गात – येथे केवढा आनंदाचा प्रसंग' – एकजण म्हणाला.

खाली कोणीतरी त्या स्वयंसेवकास पुढे जाण्यास सांगितले. तो स्वयंसेवक शांतपणे पुढे चालला.

''मला मुळीच भूक नाही पोटात – '' बाबुशेट म्हणाले.

बाबू एकटाच एका बाजूला गेला व रडू लागला. सगळीकडे हाकाहाक झाली. बाबू रडू लागला. बाबूला उचलून आणण्यात आले. त्याला गादीवर पलंगावर निजवण्यात आले. डॉक्टर आले. डॉक्टरांनी घाबरण्याचे कारण नाही सांगितले व औषध पाठवतो असे म्हटले. आजूबाजूचे लोक तोंडावर चिंता दाखवू लागले. 'काय झाले एकाएकी बाबू – बेटा काय झाले' रतन शेटनी विचारले.

'आता मला बरे वाटते. हे कपडे काढले म्हणजे आणखी बरे वाटेल. बाबा हे जरीचे कपडे नकोत.' बाबू म्हणाला.

'काढ रे त्याचे कपडे. नुसता तो रेशमी शर्ट घाल.' शेटजी म्हणाले.

बाबू जास्त काही बोलला नाही. बाबू बरा आहे असे वाटल्यामुळे रात्री जास्तच नाचरंग उडाला. बाबू मात्र अंथरुणावर रडत होता.

✦✦✦

## २

बाबू इंग्रजी शाळेत जात होता. त्या शाळेत एक त्रिंबकराव म्हणून शिक्षक होते. त्यांचे हृदय फार थोर होते. मुलांच्या मनावर उत्कृष्ट संस्कार घडवणे म्हणजे शिक्षण असे त्यांना वाटे. ते इतिहास व भाषाविषय शिकवीत, ते जिवंत इतिहास शिकवीत. कधी वर्गात नवजीवन आणून वाचून दाखवीत, तर कधी तरुण भारत आणून वाचीत, कधी जन्मभूमी वाचून दाखवीत, तर कधी त्रिवेणी, कुमार, प्रवासी, सरस्वती, विशाल भारत वगैरे हिंदी, बंगाली, गुजराथी, मासिकांतील अनेक विषयांवरचे लेख वाचून दाखवीत, कधी आचार्य प्रफुल्लचंद्र म्हातारपणी खादीकामास कसे वाहून घेत आहेत, प्रोफेसरी सोडून आचार्य कृपलानी संयक्त प्रांतात खादीसंवर्धन कसे करीत आहेत, जेठालभाई बुंदेलखंडातील अत्यंत दरिद्री प्रदेशात कसे सेवा करून राहिले आहेत हे



सांगत, अनाथांच्या हालअपेष्टांचे वर्णन करून मुलांना हे रडवीत. कधी पुढे सेवेस वाहून घ्या असे सांगत.

त्रिंबकरावांचा तास म्हणजे मुलांना मेजवानी असे. कधी वाङ्मयासंबंधी सांगत, तर कधी खरे शिक्षण म्हणजे काय याविषयी सांगत. मोठमोठ्या लेखकांचा ते परिचय करून देत. साहित्यक्षेत्रातील गोष्टी सांगत. कालिदास, वाल्मिकी नुसता उल्लेख कोठे आला पुरे –– म्हणजे त्यांची हृदयगंगा भावनांनी वाहू लागे. त्यांच्या जिभेवर सरस्वती जणू येऊन नाचे.

एक दिवस प्राचीन काळातील शिक्षणावर ते सांगत होते 'प्राचीनकाळी ठरलेली फी नसे. जो तो आपापल्या ऐपतीप्रमाणे शिक्षण संपले म्हणजे फी नेऊन देई–गुरुदक्षिणा म्हणून नेई. ती फी नसे–दक्षिणाही नसे. ते कृतज्ञतेचे चिन्ह असे. गरीब विद्यार्थी फूलही नेऊन देई. त्याची कृतज्ञता त्या फुलात असे. श्रीमंत हजारो सुवर्ण नाणीही नेऊन देई. कृतज्ञतेला मोल नाही. देवाला कृतज्ञतेचे तुळशीपत्र राजभांडाराहून प्रिय आहे. या हृदयातील कृतज्ञतेचे द्योतक म्हणून गुरुदक्षिणा शिष्य देई. यथाशक्ती शिष्य देत असे. आज फी देतो ती जणू कायद्याने देतो. त्यात ना हृदय ना भावना. श्रीमंत असला तरी चार रुपये महिना देणार – गरीब असला तितकीच द्यावी लागणार ? केवढा अन्याय चालला आहे ? बाबूसारख्या लखपतीला चार रुपयेच फी व त्या हरीलाही चार रुपये फी. हरी मजुराचा मुलगा ! वास्तविक हरीने एक फूल आणून द्यावे. बाबूने १०० रूपये आणून द्यावे ! परंतु सारे यांत्रिक झाले आहे !

काय बाबू खरे की नाही ? तुझे वडील एखाद्या फंडाला हजार रुपये देतील तर मंजूर एक दिडकी देईल. म्हणजे तुमचे हजार रुपये व मजुराच्या दिडकी सारखीच आहे. मग येथे फीचे बाबतीत असे का ? हरीचा बाप त्याला उपाशी राहून शिक्षण देत आहे, तसे तुझे नाही. तुझे वडील तुला जणू फुकट शिकवीत आहेत. तर शिक्षणाला गरीब चार रुपये देतो, त्याला तुझे वडीलही चारच देणार ? यात काय शोभा ? प्राचीन हिंदुस्तानातील लोकांची दिलदारी आठवली म्हणजे रडू येते. आपण आज सारे भामट्ये झालो आहोत – गरिबाला छळून त्याच्यावर सारा बोजा टाकीत आहोत.

बाबूच्या मनावर त्रिंबकरावांच्या विचारांचा फार परिणाम झाला. त्रिंबकरावांच्या म्हणण्यात अर्थ आहे असे त्याला वाटे. परंतु तो काय करणार ? अजून तो मोठा थोडाच झाला होता. अजून तो लहान होता. बाबा त्यांचे थोडेच ऐकणार होते. चार रुपयांऐवजी १०० रुपये थोडेच देणार होते ?

✦✦✦

## ३

वर्गात कधी स्वदेशावर बोलणे निघे. तुम्ही साधी खादी वापरत नाही – तुम्ही पुढे काय ध्वजा लावणार ? देशभक्ती म्हणजे शब्द नव्हे. देशभक्ती म्हणजे देशातील दीन लोकांचे दु:ख दूर करणे. ते दूर करण्यासाठी स्वत: त्याग करणे, कष्ट सोसणे. तुम्ही जाडीभरडी खादी वापरण्यासही तयार नाही. जरा महाग पडली तर पडली. चिवडा घेऊ नका, नाटकाला जाऊ नका, सिनेमाला जाऊ नका. पुण्याच्या तीनचार कॉलेजमध्ये मिळून तीन हजार विद्यार्थी धरले तर दररोज आणा दोन आण यांचे चिवडा चहात जात असतील. म्हणजे रोज १०० रुपये एका पुण्यातील फक्त कॉलेजातील विद्यार्थी चहा, चिरुट, सिगारेट, चिवडा, भजी यांत जात असतील. म्हणजे महिना ३००० रुपये ! वर्षाला ३६००० रुपये एका पुणे शहरातील फक्त कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे अनाठायी जात आहेत ! नाही त्याने शरीराला पुष्टी, ना आरोग्य, ना समाधान ! उलट तामसी व उत्तेजक पदार्थ खाऊन व्यसनोन्मुख होतात ! ३६००० रुपयांची खादी घालतील तर किती गरिबांचे पोट भरेल ! वर्षाला २५ रूपयात गरीब पोट भरतो. ३६००० रुपयात १५०० लोकांचे पोट भरेल. १५०० लोकांनी विणलेली खादी घ्या. फुकट नका देऊ त्यांना ३६००० रूपये ! अरे विचार करा, तुम्हाला हृदयच नाही. तो एक स्वयंसेवक गाणे गात येतो ना –

**''हृदय जणू तुम्हा ते नसे । हृदय जणू तुम्हा ते नसे ।''**

बाबूला तो गाण्याचा चरण आठवला. त्या दिवशीचे ते घरचे नाच, तमाशे आठवले. बाबूला लाज वाटली.

आज मामलेदारांचा मुलगा नवीन धोतर नेसून आला होता. खास विलायतचा धोतरजोडा होता. त्रिंबकरावांच्या ते लक्षात आले व त्यांनी म्हटले ''ललित, मी वर्गात इतके सांगतो तरी विलायती धोतर नेसून आलास ना ? अरे शिकता तरी काय ? मनावर जर काही संस्कार होत नसेल, माणुसकी, उदारता, आजूबाजूच्या देशस्थितीचा विचार काहीच हृदयात येत नसेल तर शिकता तरी काय ? असे फुलपाखरी तरुण तुम्ही किती दिवस राहणार ?

''मी विलायतीच नेसेन. बाबांची नाहीतर नोकरी जाईल – बाबा मला म्हणतात खादीबिदीच्या बंडात तू नको पडू–'' ललित म्हणाला.

मुलं हसू लागली. ''हसू नका. तुम्ही त्याच प्रकारचे, ललितला वडिलांची आडकाठी नसती तर त्याने खादी घातली असती असे वाटते, परंतु तुम्हाला तितकी वडिलांचीही आडकाठी नसेल तर तुम्ही काय करता ? हिंदुस्थान दुर्दैवीच देश आहे. परमेश्वराला हिंदुस्थानला धडे शिकवावयाचे आहेत. अजून तुम्ही शिकत नाही. जोपर्यंत



धडे शिकणार नाही, तोपर्यंत गुलाम राहा– गुलाम. ललित, अरे वडिलांजवळ झगडावे जरा. पुष्कळ सरकारी नोकर आता खादी वापरतात. बारीक खादी तर समजतही नाही. ही खादी आहे की काय आहे. असे भिऊन कसे चालेल ? सध्या भिऊन चालणार नाही.'' त्रिंबकराव सांगत होते.

शाळेच्या चालकांना आज मामलेदारांकडून बोलावणे आले होते. शाळेच्या चालकांचे नाव गणपतराव असे होते. गणपतराव मोठ्या शिताफीने वादळी हवेतून शाळेची नाव हाकवून नेत होते. आपल्या शाळेत राष्ट्रीय भावना खेळवल्या जाव्या असे त्यांना वाटत असे. राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षक म्हणून मुद्दाम ते शाळेत घेत. त्यांना उत्तेजन देत. शाळेतील सारे शिक्षक खादी वापरीत परंतु आज गणपतरावांना का बरे बोलावणे आले होते ?

मामलेदार साहेब घरी गादीवर बसले होते. शिपायाने आत जाऊन सांगितले की, शाळेचे प्रमुख गणपतराव आले आहेत. ''या, आत या गणपतराव मामलेदारसाहेबांनी खुर्ची दिली. आपण एका खुर्चीवर बसले.

''शाळा चांगली चालली आहे ना ? मॅट्रिकचा निकाल यंदा चांगलाच लागला. शेकडा सत्याहत्तर पास झाले – होय ना –'' मामलेदारसाहेबांनी सूतोवाच केले.

''हो. सारे शिक्षक मेहनती आहेत. रात्री दिवसा दीडशे मुलांचे वर्ग घेतात. खटपट करतात. त्याचा हा परिणाम आहे. शाळेत चांगले शिक्षक असले तर शाळा नाहीतर दगड व बाके –'' गणपतराव म्हणाले.

''हल्ली मुलांची संख्या किती आहे – शाळेत'' मामलेदारांनी विचारले.

''मुलांची संख्या सातशे आहे. मुलांकडून तूट नाही. शाळेची इमारत पुरी पडत नाही म्हणून मुलांना नाही म्हणावे लागते. सरकार तर ग्रँटही वाढवीत नाही. मुलांना नाही म्हणताना मोठे वाईट वाटते. छात्रालयात तर एकेका खोलीत पाच पाच मुले ठेवली आहेत. आईबाप मुले ठेवूनच जातात. म्हणतात तुमच्या व्हरांड्यात ठेवा, अंगणात ठेवा मुले, तरी चालेल. एकीकडे हृदय भरून येते, की लावलेल्या झाडाला जशी पालवी फुटावी – तरी एकीकडे वाटते – शेवटी पैशाची जरूर पडतेच.'' गणपतराव म्हणाले.

''तुमच्या काही चुकांमुळे ग्रँट मिळत नाही. सरकारचे बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष असते.'' मामलेदार साहेब म्हणाले.

''तसे काही चुकत असेल तर सांगा. आम्ही सुधारू'' गणपतराव नम्रतेने म्हणाले.

''हे पाहा काही शिक्षक आपल्या उत्साहाच्या भरात मर्यादेचे अतिक्रमण करतात व भलतीकडेच वाहतात. वर्गात ठरलेले पुस्तक शिकवण्याऐवजी ते नकोत त्याही गोष्टी